दूधगंगा

संपूर्ण आयुर्वेदीक पशु आहार

जागतीक दर्जाचे उत्पादन

दुधगंगा पशु आहार वापराचे फायदे

- जनावरांच्या शरीरास उपयुक्त व मजबुतीसाठी योग्य अशा आयुर्वेदिय वनस्पतींच्या पावडरचे मिश्रण.
- जनावरांची शरीरक्रिया उत्तम प्रकारे चालु राहते.
- जनावरांचे पोषण, उत्पादन, प्रजोत्पादन इत्यादींसाठी ते आवश्यक घटकांची पुर्तता होते.
- जनावरांची वयात येण्याचे कार्य सुरळीतपणे चालते.
- जनावरांमधील कमजोरी दुर करुन नवचैतन्य निर्माण करते.
- गाभण अवस्थेमध्ये उपयुक्त पोषक तत्वांचा पुरवठा करते.
- सुरवातीच्या कोवळ्या दुधा मधून भरपुर प्रमाणात कॅल्शियम कमी होते, त्याचा पुरवठा करते.
- दुधवाढीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.
- या मधील काही आयुर्वेदीय घटकांमुळे फॅट्स वाढी मध्ये लाभदायक.
- हाडांच्या मजबुतीसाठी व दुध निर्मितीमध्ये कॅल्शियमचा पुरवठा करते.
- सर्व हार्मोन्सचे स्त्रावणे व्यवस्थित केल्याने जनावर वेळेवर माजावर येते त्यामुळे भाकड काळ कमी होतो. परिणामी प्रत्येक वेताचे अंतर सुनियोजित होते.

वितरक नेमणे आहे
गाव / तालुका / जिल्हा
- संपर्क -
+९१ ९०९६७४४३३३
कोल्हापूर जिल्हा वितरक ९४२२७५३११४

स्वाभिमानी विचार
प्रति,
Book-Post
RNI No. - MAH/MAR/2005/16213
Rgd. No.L2/17/RNP/K.L.P/234/12-14

वर्ष ८ अंक २ १ जानेवारी २०१३ किंमत ५ रुपये पाने २०
RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/12-14
स्वाभिमानी विचार
संपादक : खासदार राजू शेट्टी

साखर कारखानदारांचे पवार 'जाणते' नेते

पान ३ वर ▶

फर्मान २१०० रुपयांचे होते : खा. राजू शेट्टी

कोल्हापूर : मुंबईत बसणाऱ्या नेत्यांकडून २१०० रुपयेच द्या,असे वरुन फर्मान होते, मात्र, शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळेच ऊसास २५०० रुपये दर मिळाला, २१०० रुपये देऊन उर्वरित पैसे येणाऱ्या लोकसभा -विधानसभा निवडणुंकामध्ये साखर सम्राटांना वापरायचे होते, पण त्या भ्रष्ट मार्गाऐवजी आता रास्त मार्गाने हे पैसे शेतकऱ्यांना मिळत आहेत याचा आपणास सार्थ अभिमान आहे. असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी केले.

सविस्तर वृत्त पान २ वर ▶

गणेश बेकरी नांदणी

ISO 9001 2000 CERTIFIED COMPANY

ताजे व स्वादिष्ठ पदार्थांची रुचकर मालिका....

फरसाणा (नमकीन) ● स्विटस् ● वेफर्स ● बेकरी प्रॉडक्टस्

A/p: Nandani, Tal: Shirol, Dist: Kolhapur. Pin: 416 102 Maharashtra (INDIA) Ph: 02322 - 239952 / 234052 Fax: 02322 -239852 E-mail: ganesh_bakery@yahoo.co.in

◆ वर्ष ८ ◆ अंक २ ◆ १ जानेवारी २०१३ ◆ पाने २०

शेतकरी संघटना स्वाभिमानी

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

◆ **कार्यकारी संपादक** ◆
डॉ. महावीर अक्कोळे

◆ **सह संपादक** ◆
डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार

◆ **निवासी संपादक :** सदाभाऊ खोत

◆**मानद सल्लागार** : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी. जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक** : सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय** : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Email : rajushetti@gmail.com

वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

नराधमांना फाशीच व्हावी

दिल्लीत एका २३ वर्षी तरूणीवर चालत्या बसमध्ये ६ जणांनी पाशवी बलात्कार केला. ही गोष्ट म्हणजेच भारतीय संस्कृतीवर घाला असून मानवतेलाही काळीमा फासणारी आहे. त्या मुलीला प्रचंड मारहाणही करण्यात आली. तसेच तिच्या अवघड जागेवर प्रहार केल्यामुळे ही गंभीर जखमी झाली. सिंगापूरमध्ये तिचा दुर्देवी मृत्यू झाला.

याचे पडसाद संपूर्ण देशभर उमठणार हे साहजकिच होते. दिल्लीतही मोठ्या प्रमाणातही निदर्शने करण्यात आली. बलात्काऱ्यांना आता कशाचेच अभय उरलेले नाही. ना कायद्याचे ना पोलिसांचे. यांच्यावर कारवाईसाठी आपला कायदाच तोकडा पडत असून त्यांच्यावर कठोर शासन करण्यासाठी कायदे अधिक कडक करणे गरजेचे आहे. एवढे पडसाद उमटूनही बलात्काराच्या घटना अजूनही घडत आहेत. त्यामुळे स्त्रीयांच्या मनात एक भीतीचे वातावरण तयार झाले आहे. ग्रामीण भागातही हे लोण पसरल्याचे चित्र दिसत आहे. राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या सोयीचे कायदे करून अनेक आरोपी सहीसलामत कसे सुटतात हे पाहिले आहे. एखादी अत्याचारीत स्त्री जर पोलिसात गेली की तिच्यावरच प्रचंड दबाव आणला जातो. तुला कोणी सांगितले होते तिकडे जायला, तु खोटारडी आहेस असे अनेक प्रश्नांचा मनावर भडिमार करून तिला तक्रार देण्यापासून प्रवृत्त केले जाते. काही ठिकाणी कायद्याचे रक्षकच भक्षक बनले जातात. पोलिसही ब्लॅकमेलिंग करतात. प्रसंगी लाच खाऊन पैसे उकळले जातात. असे प्रकार सर्रास घडत आहेत. मग कायदा आता जातो कुठे? स्त्रियांच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. तसेच आरोपीविरूध्द कठोर शिक्षेची तरतूद करून त्यांना कड़क शिक्षा झाली पाहिजे. कॉलेज युवक- युवर्तीनीही समाजाचे भान ठेवून वागले पाहिजे हेही तितकेच खरे आहे. एकीकडे स्त्रियांच्यावर अत्याचार होतात , त्यांना न्याय दिला जात नाही, दुसरीकडे मात्र सत्ताधारी नेते विचित्र विधाने करून परिस्थीती बिघडवू पाहत आहेत. असेच जर होत असेल समाजाची दिशा वेगळ्या दिशेने भरकटत जाईल. वेळीच याला अंकुश आणला पाहिजे नाही परिस्थिती हाताबाहेर जाणार ने मात्र निश्चित.

फर्मान २१०० रुपयांचे होते : खा. शेट्टी

कोल्हापूर : मुंबईत बसणाऱ्या नेत्यांकडून २१०० रुपयेच द्या,असे वरुन फर्मान होते, मात्र, शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळेच ऊसास २५०० रुपये दर मिळाला, २१०० रुपये देऊन उर्वरित पैसे येणाऱ्या लोकसभा – विधानसभा निवडणुंकामध्ये साखर सम्राटांना वापरायचे होते, पण त्या भ्रष्ट मार्गाऐवजी आता रास्त मार्गाने हे पैसे शेतकऱ्यांना मिळत आहेत याचा आपणास सार्थ अभिमान आहे. असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी केले.

खडकेवाडा (ता. कागल) येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शाखा उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब पाटील होते.

शेट्टी पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील स्वाभिमानी शेतकऱ्यांचे नेतृत्व करतो याचा सार्थ अभिमान मला आहे. परंतु १० वर्षात कागलमध्ये काहीच करता आले नव्हते याची मला खंत होती. परंतु यावर्षी आंदोलनाला दु:खाची झालर असूनही कागलकरांनी सर्व काही करुन दाखवले. यापुढेही अशीच मला साथ द्या, मी तुम्हाला न्याय देतो.

यावेळी तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांचे भाषण झाले. यावेळी भगवान काटे, युवराज कदम, आण्णासाहेब खोत, जिल्हाध्यक्ष प्रा. जालंदर पाटील, तालुका उपाध्यक्ष नामदेव भराडे, पप्पू कोराणे, प्रभू भोजे, संभाजी खोत, आर. जी. मेटकर, बाळासो भोजे, शिरोळ तालुका अध्यक्ष आदिनाथ हेमगिरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक सरपंच जयसिंग जाधव यांनी केले. तर 'स्वाभिमानी' ची शपथ घेऊन खा. राजू शेट्टी यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२१९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग	बँक सतत	स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

TEXMO INDUSTRIES Taro

अधिकृत विक्रेते

बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, टवी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२१७३१४७

गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

M/S. MANGAVE BOREWELLS

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266

Shree Datta Prestrestess

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.

साखर कारखानदारांचे पवार 'जाणते' नेते

लिंब येथील जाहीर सभेत खा. राजू शेट्टी यांची टीका

लिंब (वार्ताहर) : गेल्या वर्षाचा उसाचा हिशेब चुकता करुन यावर्षी उसाला प्रति टन ३ हजार रुपये दर जाहीर केल्याशिवाय साखर सम्राटांना उसाच्या कांड्याला हात लावू देणार नाही. मात्र योग्य दर मागणाऱ्या शेतकऱ्याला मारण्याची धमकी देणाऱ्या साखर कारखानदारांना रस्त्यावर तुडवून मारा असा आदेश स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खा. राजू शेट्टी यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर मेळाव्यात दिला. शरद पवार यांना शेतकऱ्यांपेक्षा साखर कारखानदारांची चिंता आहे. त्यामुळे ते शेतकऱ्यांचे नव्हे तर साखर कारखानदारांचे जाणते नेते असल्याची टिकाही त्यांनी यावेळी केली.

लिंब,ता. सातारा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, लिंब गावचे पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष प्रदिप पाटील, डी.जी. पाटील, मिथून अटोळे-पाटील, अर्जुन साळुंखे, पांडुरंग शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

खा. शेट्टी म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे शेतकऱ्यांबाबतचे निर्णय नेहमी चुकतात. साडेबारा रिकव्हरीच्या टनाला १२५ किलो साखर पडते. मात्र शरद पवार म्हणतात १२० किलोच पडते, मग पाच किलो साखर जाते कुठे? याचे उत्तर शरद पवारांनीच द्यावे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांची कर्जे माफ केली मात्र कर्जमाफीतील सुमारे ११०० कोटी रुपयांचा आजपर्यंतचा हिशोब लागला नाही. शेतकऱ्यांचा जाणता राजा म्हणवून घेणाऱ्या शरद पवार यांना शेतकऱ्यांपेक्षा साखर कारखानदारांची चिंता आहे. त्यामुळे ते शेतकऱ्यांचे जाणते राजे होऊ शकत नाहीत. त्यांनी स्वत:ला शेतकऱ्यांचे राजे म्हणवून घेवू नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

खा. शेट्टी म्हणाले, राज्यात १३४ साखर कारखाने असून साडेतीन कोटी ऊस उत्पादक आहेत. परंतु शेतकऱ्यांनी उसच पिकवला नाही, तर साखर कारखान्यात काय टाकणार? असा सवालही त्यांनी केला. ते पुढे म्हणाले, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असणाऱ्या दौंड येथील साखर कारखान्याने शेतकऱ्यांना २ हजार रुपयांनी दर दिला. तर त्यांच्याच शेजारी असणाऱ्या साखर कारखान्याने २ हजार ४०० रुपयांनी दर दिला. यावरुनच अजित पवार यांनी शेतकऱ्यांना प्रती टनाला ४०० रुपयांचा बांबू लावला. अजित पवार राज्यातील सहकारातील साखर कारखाने लिलावात काढून पुन्हा खरेदी करण्यात पटाईत असल्याचा आरोपी त्यांनी केला. तसेच सातारा जिल्हातीलच जरंडेश्वर साखर कारखान्याची मूळ किंमत आजपर्यंत कळालीच नसल्याचे त्यांनी सांगितले. साखर कारखानदार वजन काट्याबरोबर दरामध्येही खात आहेत. यावर अंकुश ठेवण्यासाठी माझ्या खासदार फंडातून प्रत्येक साखर कारखान्यापुढे वजन काटा उभा करणार आहे. त्यामुळे काटामारीला आळा बसणार आहे.

साखरसम्राटांची ब्राझीलमध्ये शेती : सदाभाऊ

अर्थमंत्री राज्य बँकेला जाब का विचारत नाहीत : खा.राजू शेट्टी

भिलवडी : शेतकऱ्यांचे आंदोलन हातपाय तोडून मोडून काढण्याची भाषा करणाऱ्या साखरसम्राटांची ब्राझीलमध्ये शेकडो एकर शेती आहे. तेथे साखर कारखानदारी काढून त्यांना पैसा कमवायचा आहे. त्यासाठी गुलाम म्हणून येथील शेतकऱ्यांच्या मुलांना राबवायचे आहे, अशी घणाघाती टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी केली. राज्य बँकेने उचल कमी केली तेव्हा अर्थमंत्री जयंत पाटील यांनी का जाब विचारला नाही? असा सवाल खासदार राजू शेट्टी यांनी केला.

पलूस तालुक्यातील धनगाव येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेची सभा झाली. सभेला परिसरातील सात हजारहून अधिक शेतकरी उपस्थित होते. शेट्टी यांचा सत्कार प्रगतशील शेतकरी केरु यादव यांच्या हस्ते करण्यात आला.

खोत म्हणाले, गृहमंत्री झाल्यापासून जयंत पाटील यांना मांडवली शब्द माहित आहे. त्यामुळे ते सध्या सारखे मांडवली - मांडवली करीत आहेत. शेतकऱ्यांची हातपाय मोडण्याची भाषा हे करीत असतील तर यांच्यापेक्षा दाऊद, अरुण गवळी बरे, गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी तर आपण हनुमान समजत होतो. पण त्यांनी रावणाशी दोस्ती केली आहे. सभासद कारखान्याचा मालक असल्याचे साखरसम्राट सांगतात, मग दर ठरविण्याचा अधिकार त्यांना का नाही? पवार काका पुतण्याचे सुरु असलेले भांडण व राजीनामा नाट्य ही भ्रष्टाचार लपविण्यासाठी नौटंकी आहे.

शेट्टी म्हणाले, चळवळीला बदनाम करण्याचा विडा काहीजणांनी उचलला आहे. पण आम्ही घामाचे दाम मागतो हा गुन्हा आहे का? यांना आमचा ऊस फुकट पाहिजे? यासाठी सुरु असलेली गुंडागर्दी कदापि खपवून घेणार नाही. जयंत पाटील यांनी अनेक कारखाने घशात घातले आहेत. शेतकऱ्यांना लुटण्यासाठीच ते कारस्थान करीत आहेत. गेल्या हंगामातील कारखान्यांनी दुसरा हप्ता का दिला नाही, राज्य बँकेने पहिली उचल ८५ वरुन ७५ टक्के केली, तेव्हा अर्थमंत्री कोठे होते,त्यांनी का जाब विचारला नाही.

ते पुढे म्हणाले, राज्यातील जवळपास सर्वच मंत्र्यांचे खासगी कारखाने आहेत. सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, वनमंत्री पतंगराव कदम, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, बबनराव पाचपुते यांच्यासह अनेकांचे खाजगी कारखाने आहेत. अनेक सहकार कारखाने बंद पाडून ते कवडीमोल दराने या साखरसम्राटांनी विकत घेतले आहेत. याची सीबीआय चौकशी झाल्यास सत्य बाहेर येईल. या विकत घेतलेल्या कारखान्यांना ऊस मिळवून सहकार बंद पाडण्यासाठी दराची कोंडी केली जात आहे. यात शरद पवार यांचा पुढाकार आहे.

मुख्यमंत्री ऊस दराशी संबंध नाही म्हणतात, मग साखर उद्योगातून दरवर्षी कोट्यावधीचा कर का घेता याचे उत्तर द्या. शरद पवार यांचे शेतकऱ्यांना भिती घालण्याचे कारस्थान वर्षानुवर्षापासून सुरु आहे. पण आता हा उद्योग त्यांनी बंद करावा.

आता दर दिला नाही तर शेतकरी उस लावणार नाहीत हे लक्षात ठेवावे आणि कारखानदारी आजारी पडल्याशिवाय राहणार नाही. एकीकडे पवार पाच हजार दर मिळाला तर आनंद होईल असे म्हणतात. दुसरीकडे कारखानदारांची बैठक घेऊन बंदोबस्तात वाहतूक करण्याच्या सूचना देतात. तर काही वेळी माझा संबंध नाही म्हणतात, याचा अर्थ काय? पवार माझ्याबरोबर आंदोलनात सहभागी झाले तर सहा हजार दर घेऊ असा टोलाही त्यांनी लगावला. यावेळी बी.जी.पाटील, संदीप राजोबा, जयकुमार कोले, सयाची मोरे यांची भाषणे झाली. स्वागत युवा नेते सत्पाल साळुंखे यांनी केले. प्रास्तविक दीपक भोसले यांनी केले.

गाव करील ते राव करील काय

सभेसाठी धनगावमधील सर्व ग्रामस्थ पक्षीय मतभेद विसरुन एकत्र आले. एकत्रित येवून सर्व शेतकऱ्यांतर्फे १३ हजार रुपयांचा निधी स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आला.यावेळी अनेक वक्त्यांनी या छोट्याशा गावात क्रांतीकारी विचारांची मशाल पेटू शकते, हे आदर्शवत आहे. आसपासच्या गावातही असेच घडावे आणि सत्ताधाऱ्यांना धडा शिकवावा,असे सांगितले.

राज्यकर्त्यांचे शेतकऱ्यांना खड्डयात घालण्याचे धोरण

एक दिवस आमच्या इशाऱ्यावर चालणारे राज्य येईल : खा. राजू शेट्टी

कागल : आम्ही कारखानदारांकडे उसाचा हिशेब मागितला यात आमचे काय चुकले? आमचा ऊस नेता, मग दर काय देता हे विचारायचे नाही का? राज्यातील साडेतीन हजार आंदोलकांवर दरोडे आणि खुनाचे गुन्हे लावून त्यांना तुरुंगात पाठविले. ज्यांनी कारखाने मोडून खाल्ले, राज्य सहकारी बँक खाल्ली, धरणे खाल्ली ते उजळमाथ्याने फिरत आहेत. एक दिवस आमच्या इशाऱ्यावर चालणारे सरकार येईल. त्यावेळी तुम्हालाही तुरुंगात जावे लागेल. त्या सर्वांना गजाआड पाहण्याची इच्छा आहे. राज्यकर्ते शेतकऱ्यांना खड्डयात घालण्याचे धोरण राबवितात, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खा. राजू शेट्टी यांनी केले.

येथील गैबी चौकात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात खा. शेट्टी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. जालंदार पाटील होते. मेळाव्यात शेतकऱ्यांकडून जमा झालेला २ लाख ५५ हजार रुपयांचा निधी खा. राजू शेट्टी यांना देण्यात आला.

खा. शेट्टी म्हणाले, आमचे आंदोलन चिरडायचे असे राज्यकर्त्यांनी ठरवले होते. तथापि, आम्हाला यश मिळाले, परंतु या विजयास दु:खाची किनार आहे. आंदोलनात आमचे दोन कार्यकर्ते मारले गेले. न्यायासाठी झगडलो. राज्यकर्त्यांनी काय दिले? सगळा चोरांचा बाजार आहे, हे सांगून आता गावेच्या गावे शहाणी झाली आहेत.

ते म्हणाले, शेतकऱ्यांचा नेता म्हणवून घ्यायला आम्हाला अभिमान वाटतो म्हणून शेतकऱ्यांसाठी लढणे गुन्हा आहे का? गुन्हा असेल तर तो आम्ही वारंवार करु, शेतकऱ्यांसाठी लढणारी माणसे संघटनेत आहेत. शासन म्हणते शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाई घेऊ. शेतकरी ती जरुर देतील, मात्र आमचे गेलेले दोन कार्यकर्ते शासनाने द्यावेत. आमच्यासाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांची कुटुंबे आम्ही उघड्यावर सोडणार नाही. त्यांचे लोकसहभागातून पुनर्वसन करणार आहे. प्रा. जालंदर पाटील म्हणाले, महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या घामावर श्रीमंत झाला आहे. शरद पवारांनी नाही, उलट नेतेमंडळींनी सहकार मोडीत काढण्याचे काम केल्याचे त्यांनी सांगितले. सदाभाऊ खोत म्हणाले, पवारांनी आंदोलन काळात जातीयवाद निर्माण केला. तथापि, जातीपेक्षा माणसाचे कर्तृत्व पाहावे. भविष्यात शेतकऱ्यांनी ताकद दाखवली तर ऊसाला ३००० रुपये दर मिळेल.

यावेळी अविनाश मगदूम, बाळासाहेब पाटील, अजित पवार, सावकार मादनाईक, उल्हास पाटील, चंद्रकांत मेटकरी यांची भाषणे झाली. स्वागत व प्रास्ताविक सागर कोंडेंकर यांनी केले. मेळाव्यास शिरोळ पं.स. सभापती युनुस पटेल, अमर पाटील, प्रभू भोजे, सुरेश पाटील, सचिन मगदूम, सयाजीराव मोरे आदिंसह संघटनेचे कार्यकर्ते,शेतकरी उपस्थित होते.

ऊस आंदोलनानंतर

आता दुष्काळग्रस्तांसाठी संघर्ष

- **वाट बिकट, मात्र कठीण नाही**
- **१३ जानेवारीला मांजर्डे येथे 'स्वाभिमानी'ची पहिली पाणी परिषद**
- **दुष्काळग्रस्तांनी रस्त्यावर येण्याची गरज**

कोल्हापूर : खा. राजू शेट्टी हे गेली १५ वर्षे ऊस दरासाठी साखर सम्राटांशी लढा देत आहेत. आक्रमक आंदोलनाने त्यांनी साखर सम्राटांना गुडघे टेकायला लावले आहे. त्यांच्या आक्रमक आंदोलनामुळे सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर , पुणे या जिल्ह्यात त्यांच्या स्वाभिमानी संघटनेचा झंझावात निर्माण झाला आहे. साखर सम्राट आणि सहकाराच्या वादळात त्यांनी दिवा लावण्याचा प्रयत्न केला आहे. आता त्यांनी पिढ्या न् पिढ्या दुष्काळाशी झुंजणाऱ्या, थेंब न् थेंब पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या दुष्काळग्रस्तांचे आसू पुसण्याचा निर्णय घेतला आहे.

आंदोलनास सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील मांजर्डे येथून प्रारंभ होणार आहे. ऊस आंदोलन कष्टकऱ्यांचा संघर्ष सुरु आहे तर दुष्काळग्रस्तांचा संघर्ष हा उपाशीपोटी लोकांचा संघर्ष आहे. त्यामुळे हा संघर्ष अवघड आणि कठीण आहे. या संघर्षात पहिल्या टप्प्यात सगळेच यश येईल असे नाही. त्यामुळे हा संघर्ष सातत्याने करावा लागणार आहे. त्यासाठी त्यांनी मनाचा संयम ठेवून काम करावे लागणार आहे.

ताकारी, म्हैसाळ आणि टेंभू या योजना पूर्ण व्हाव्यात यासाठी क्रांतिवीर नागनाथआण्णा पाटणकर, बाबुराव गुरव यांनी सलग १८ वर्षे संघर्ष केला आहे. या संघर्षात त्यांना बऱ्यापैकी यश आले. या संघर्षामुळेच युती सरकारने कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना १९९६साली केली. या महामंडळाच्या माध्यमातून देण्यात आली. मात्र, पुन्हा भ्रष्टाचार आणि निधीच्या गर्तेत या योजना अडकल्या त्या गर्तेतून अद्याप बाहेर पडलेल्या नाहीत. २०१२ साल उजाडले तरी अद्याप या योजना पूर्णत्वास गेलेल्या नाहीत.

त्यामुळेच या योजना पूर्णत्वासाठी टोकाच्या संघर्षाची गरज आहे. रक्तरंजित लढाई लढल्याशिवाय शासन हलणार नाही. आजपर्यंत या लढ्याला आक्रमक नेतृत्व नव्हते. कॉंग्रेस, राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केवळ सोयीसाठीच या योजनांचा वापर केला. निवडणुका आल्या की योजना पूर्ण करण्याचे आश्वासन द्यायचे, नवीन योजनांचे नारळ फोडायचे, निवडणुका संपल्या की पुन्हा ये रे माझ्या मागल्या या न्यायाने आजपर्यंत हे नेते वागत आले आहेत. हाडाची काडं आणि रक्ताचे पाणी करुन राबणारे दुष्काळग्रस्त गेली अनेक वर्षे हिरव्या शेताचं स्वप्न बघत जगत आले आहेत. कधीतरी राज्यकर्त्यांना शहाणपण येईल आणि हिरव स्वप्न फुलेल ही आशा ठेवून जगणाऱ्या दुष्काळग्रस्तांची मनं करपली आहेत. मनगट थकली आहेत. लढण्याचे बळ संपल आहे. कारण गेली २८ वर्षे ते केवळ राज्यकर्त्यांच्या भुलथापाच ऐकत आले आहेत.

पण आता या दुष्काळग्रस्तांच्या हाकेला ओ देणारा, बोलेल तो करणारा नेता बळीराजाला मिळाला आहे. या लढ्याची सुरवात मांजर्डेपासून तेरा जानेवारीपासून होणार आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्तांनीही या लढ्यात तन, मन, धनाने उतरायला हवे.

पान ७ वर ▶

ऊस आंदोलनानंतर

आता दुष्काळग्रस्तांसाठी संघर्ष

▶ पान ६ वरुन

जोपर्यंत टोकाचा संघर्ष होणार नाही. शासनाला झुकविले जाणार नाही, तोपर्यंत शेताच्या बांधापर्यंत पाणी येणार नाही, हे निश्चित आहे. धरणे, मोर्चा या मार्गाने राज्यकर्ते झुकणार नाहीत. तर यासाठी मंत्र्यांना अडविणे, त्यांना गावबंदी, तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालयाला बेमुदत घेराव, बेमुदत रस्ता रोको या मार्गाने शासनाची कोंडी केली तर मुंबईपासून दिल्लीपर्यंतचे राज्यकर्ते झुकणार आहेत. त्यामुळे खा. राजू शेट्टी यांच्या आंदोलनात संपूर्ण शक्तीनिशी बळीराजाने उतरायला हवे.कुणाच्या कोंबड्याने उगवले यापेक्षा शेतात पाणी येणे महत्वाचे आहे. पाणी आले तर बळीराजाच्या जीवनात नवी पहाट उगवणार आहे.

सध्याच्या भयानक दुष्काळाने तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या बागा जळाल्या आहेत, जनावरं कत्तलखान्याकडे चाललेली आहेत. जिकडं पहावं तिकडं भयाण वाळवंटासारखी परिस्थिती झालेली आहे. विहिर, तलाव, कोरडे पडलेले आहेत. हे सारं चित्र बदलायचे असेल तर आगामी काळात होणाऱ्या पाण्याच्या संघर्षात राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून उतरायला हवे. ऊस उत्पादकांची लढाई यशस्वी होते, कारण ऊस उत्पादक ऊस दराच्या आंदोलनावेळी राजकारण बघत बसत नाहीत. कारण ऊस दर मिळाला तर आर्थिक भरभराट होणार आहे याची त्यांना जाणीव आहे. त्यामुळे पक्षीय जोडे बाजूला ठेवून सर्वजण शेट्टींच्या पाठीशी उभे राहतात, त्यांच्याप्रमाणेच दुष्काळग्रस्तांनी पक्षीय जोडे बाजूला ठेवून आंदोलन यशस्वी करण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवली तरच हा लढा निश्चितपणाने यशस्वी होईल.

ज्या प्रमाणे बळीराजाची काही जबाबदारी आहे, त्याच प्रमाणे राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, यांनीही हा लढा लगेचच यशस्वी होणार नाही. त्यासाठी कष्ट उपसण्याची तयारी ठेवायला हवी. ती तयारी ठेवली तर निश्चितच हा लढा यशस्वी होईल. काळी जमीन ज्या प्रमाणे लवकर भिजत नाही, त्याप्रमाणेच दुष्काळग्रस्तांचे आहे. ते लवकर पेटत नाहीत, मात्र पेटले तर लवकर विझतही नाहीत.

नियोजन दुष्काळ निर्मुलन संघर्ष समितीच्यावतीने दुष्काळ निर्मूलन संघर्ष समितीची स्थापना सहा महिन्यापूर्वी झाली आहे. या समितीत पत्रकार, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ते आहेत. या समितीच्यावतीने तासगाव, आटपाडी, कवठेमहांकाळ या ठिकाणी पाण्यासाठी आंदोलने केली आहेत.कृषीमंत्री शरद पवारांनाही भेटून दुष्काळग्रस्तांच्या व्यथा मांडल्या आहेत. आता खा. राजू शेट्टी, गणपतराव देशमुख, सदाभाऊ खोत यांच्या सहकार्याने पुन्हा हा लढा तीव्र करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. त्या प्रयत्नाचाच भाग म्हणून १३ जानेवारीला मांजर्डेतून पाण्याचा संघर्ष सुरु करण्यात येणार आहे.

ताकारी म्हैशाळ, टेंभूची स्थिती

ताकारीसाठी ४५० कोटी खर्च झाले आहेत. आणखी १५० कोटीची आवश्यकता आहे. म्हैसाळसाठी आणखी ४५० कोटीची गरज आहे. तर टेंभू योजना अद्याप एआयबीपीत समाविष्ट नाही. ती समाविष्ट होण्यासाठी प्रथम संघर्ष करावा लागणार आहे. या योजनेसाठी आणखी दोन हजार कोटींची आवश्यकता आहे. एवढा निधी मिळविण्यासाठी टोकाचा संघर्ष केल्याशिवाय पर्याय नाही, एवढेच मात्र, निश्चित म्हणावे लागेल.

टगेगिरी करणाऱ्यांना धडा शिकवा : खा. शेट्टी

कोगनोळी : 'राजकारण्यांच्या टगेगिरीला व पोलिसांच्या दंडुकशाहीला न जुमानता साखरसम्राटांना त्यांची जागा दाखविण्याचे काम शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून केले असून त्यांच्या दडपशाहीला शेतकरी कधीच भीक घालणार नाही.यापुढेही यापेक्षा मोठी आंदोलने उभी करुन शेतकरी आपला हक्क हिसकावून घेतल्याशिवाय राहणार नाहीत. शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनात झालेल्या नुकसानभरपाईपोटी २ कोटी ३५ लाख रुपये मागता काय? राज्यकर्त्यांनो याची लाज वाटली पाहिजे' असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खा. राजू शेट्टी यांनी केला.

आंदोलनातील मृत शेतकऱ्यांना ५६,१०० रु. मदत

कोगनोळी (ता. चिकोडी) येथे सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, कर्नाटक व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना न्याय देण्याऐवजी राज्य सरकारने शेतकरी आंदोलकांवर गोळ्या झाडल्या. एका बाजूला राजकीय नेत्यांची टगेगिरी, दुसऱ्या बाजूला साखरसम्राटांनी साखर कारखान्यामार्फत पोसलेले पैलवान,तिसऱ्या बाजूने राज्य सरकारने चालविलेली दडपशाही यामुळे सर्व शेतकरी भयभीत होऊन त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण झाली होती. कर्नाटक सरकारनेही १९८० साली तंबाखूला योग्य भाव मिळावा यासाठी आंदोलन उभे करुन सरकारला पळताभुई करुन सोडले होते. त्यावेळी याच राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांवर गोळीबार करुन १२ शेतकऱ्यांना हुतात्मे केले होते. अशी भिती निर्माण करुन आताचे राजकारणी आपली भाकरी भाजून घेत आहेत. अशा राजकारण्यांचा बीमोड करण्यासाठी शेतकऱ्यांनी भयमुक्त होऊन शेतकऱ्यांनी पुन्हा लढण्यासाठी शेतकरी संघटना उभी केली आहे.

आम्ही असलेल्या उसाचा दर सांगा म्हणून आंदोलन केले असताना तुम्ही आम्हाला गोळ्या घातल्या. यावेळी दोन शेतकरी तुमच्या गोळीबारात शहीद झाले असे असतानादेखिल झालेल्या नुकसानापोटी शेतकऱ्यांकडून तुम्ही शहीद पोलिसांना चार वर्षे झाली तरीही सरकारकडून दीडदमडीसुध्द आज अखेर मिळाली नाही. पण १२ नोव्हे. रोजी बळी पडलेल्या शेतकऱ्यांना आम्ही १७ लाख ३५ हजार रुपये मिळवून दिले आहेत. राजकीय स्वार्थासाठी तुम्ही सुरु केलेल्या दंडुकेशाहीला आता शेतकरी घाबरणार नाही. भविष्यकाळात शेतकऱ्यांचे राज्य आले पाहिजे. आता मत हे शेतकऱ्यांचे ब्रह्मास्त्र आहे. त्याचा योग्य वापर करुन स्वार्थी राज्यकर्त्यांना त्यांची जागा शेतकरी दाखवून देईल. शेतकऱ्यांच्या समस्या विधानसभेत व लोकसभेत मांडण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलालाच पाठवून देईल. राजकीय स्वार्थासाठी दंडुकेशाही उभी करणाऱ्या शेतकऱ्यांचे सोयरसुतक कोणालाच नाही. आता शेतकरी संघटना गप्प बसणार नाही. दीडदमडीचे राजकारणी व साखरसम्राटांनो लक्षात ठेवा. तुमचा अंत जवळ आलेला आहे. 'इडापिडा टळू दे बळीचे राज्य येऊ दे.' म्हणीप्रमाणे बळीचे राज्य आले आहे. आता तुमची सुटका नाही हे लक्षात ठेवा, असे बोलून शेतकऱ्यांची मुले आता सुज्ञ झाली असून त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शेतकरी संघटनेचा आधार घ्यावा, असे आवाहन करुन सर्वांनी हात उंचावून प्रतिज्ञा केली.

यावेळी बोलताना प्रा. जालंदर पाटील म्हणाले, भारत देश शेतीप्रधान देश म्हणून जगाच्या नकाशावर झळकत आहे. पण या देशातील शेतकरी कधी सुखी झाला नाही. शेतकऱ्यांना स्वत:च्या पिकाला भाव मिळावा म्हणून झगडावे लागते. नैसर्गिक आपत्ती आली तरीही सर्व नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागते. तुम्ही बाहेरील देश अमेरिका, ब्राझील, जपान येथील शेतकरी कधीच आंदोलने केलेले दिसत नाही. यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या मांडताना रविकिरण नवाळे म्हणाले, कर्नाटक सरकारनेही आजपर्यंत शेतकऱ्यांच्या

पान ९ वर ▶

टगेगिरी करणाऱ्यांना धडा शिकवा : खा. शेट्टी

▶ पान ८ वरुन

समस्या जाणून घेतलेल्या नाहीत. शेतकऱ्यांनी राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेत एकनिष्ठपणे काम करुन सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येवून लोकसभेत व विधानसभेत या भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाला निवडून देऊन शेतकऱ्यांचा आवाज केंद्रात उठविण्याची संधी द्यावी व त्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनेही तसे पाऊल उचलावे, असे आवाहन भागातील शेतकऱ्यांच्या वतीने व्यक्त केले. प्रारंभी ॲड. प्रशांत नवाळे यांनी स्वागत केले. यावेळी स्वा. शेतकरी संघटनेचे नेते खा.राजू शेट्टी यांचा सर्व शेतकऱ्यांच्यावतीने राजाराम माने व बाबुराव कगुडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून अंबिका देवीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून चिकोडी तालुका स्वा. शे. संघटनेचे अध्यक्ष रमेश पाटील, कोल्हापूरचे लाला सांगरोळे, तानाजी कुंभार, रावसाहेब चौगुले, बाळासाहेब माने, कुमार व्हटकर आदी उपस्थित होते.

यावेळी कोगनोळी व परिसरातील शेतकऱ्यांनी जे शहीद झालेले शेतकरी होते. त्यांच्या कुटुंबियांना ५६,१०० रुपये रोख येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी राजू शेट्टी यांच्याकडे सुपुर्द केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटना अध्यक्ष अनिल पाटील, ॲड. प्रशांत नवाळे, मगदूम बंधू, खोत बंधू, दख्खनचा राजा मंडळ, डी. बॉईज ग्रुप, संत गोराकुंभार मंडळ यांनी प्रयत्न केले. शेट्टींचे स्वागत करण्यासाठी रांगोळी घालून आरती ओवाळून स्वागत केले. यावेळी ढोल, ताशे, झांज पथकांच्या गजरात मिरवणुक काढण्यात आली. अरुण पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी आभार ॲड. विठ्ठल कोळेकर यांनी मानले.

शेतकऱ्यांच्या बलिदानाचा हिशेब सरकारकडून घेऊ

आंबे येथील मेळाव्यात सदाभाऊ खोत यांचा इशारा

पंढरपूर : शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य दाम मिळाल्याशिवाय यावर्षी ऊस आंदोलनात ज्या दोन शेतकऱ्यांना शासनाच्या दडपशाहीमुळे आपले प्राण गमवावे लागले त्या शेतकऱ्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब या शासनाकडून व कारखानदारांकडून वसूल केल्याशिवाय स्वाभिमानी शेतकरी संघटना गप्प बसणार नाही असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी आंबे येथील शेतकरी आभार मेळाव्यात बोलताना दिला.

आंबे, चळे, सरकोली, रांझणी, मुंढेवाडी, ओझेवाडी येथील शेतकऱ्यांनी ऊस आंदोलनाच्या काळात ऊस तोडणी न घेता शेतकरी संघटनेच्या आंदोलनास सक्रीय पाठिंबा दिला व येथून पुढील काळात ऊस वजन करुनच कारखान्यास घालणार अशी शपथ यावेळी सर्व शेतकऱ्यांनी घेतली म्हणून शेतकऱ्यांचे आभार मानण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना सदाभाऊ खोत यांनी शेतकऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत तसेच दि. १०/१२/२०१२ रोजी सांगली येथे आंदोलनामध्ये दिवंगत झालेल्या कै. चंद्रकांत नलावडे व कुंडलिक कोकाटे या दोन शेतकऱ्यांना कुटुंबाला मदत व श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास आम आदमी पक्षाचे संस्थापक अरविंद केजरीवाल उपस्थित राहणार आहेत तरी सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले. याप्रसंगी बोलताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बगाडे यांनी यापुढील काळात होणाऱ्या ऊस, कापूस, सोयाबीन व दुध आंदोलनातही शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन खोत यांचे हस्ते करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष दिपक भोसले, तानाजी बागल, नितीन बागल, युवा आघाडीचे तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, संतोष सुळे, संतोष शिंदे, प्रदिप वाघोटे, संजय ताड, सुधीर, शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अरविंद शिंदे यांनी केले तर आभार नवनाथ चौधरी यांनी मानले.

कापसाला ६ हजार रुपये हमीभाव द्या



खासदारांचे शिष्टमंडळ पंतप्रधानांना भेटले

नवी दिल्ली : कृषिमूल्य आयोगाने कापसाला यावर्षी ३ हजार ६०० रुपये हमीभाव दिला आहे. मात्र तो लागवडीपेक्षा अत्यंत कमी असल्याने कापसाचा हमीभाव हा ६ हजार रुपये प्रतिक्विंटल देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्रातील खासदारांच्या शिष्टमंडळाने आज संसदेत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची भेट घेऊन केली. यावेळी पंतप्रधान सिंग यांनी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

शेतकरी नेते खा.राजू शेट्टी, खा. विजय दर्डा, खा. हरिभाऊ जावळे, खा. ए.टी.नाना पाटील, खा. हंसराज पाटील, खा. प्रतापराव जाधव, खा. सुभाष वानखेडे, खा. वाघचौरे, खा. प्रकाश जावडेकर, खा. रावसाहेब दानवे - पाटील, आदी सदस्यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची भेट घेऊन त्यांना कापसाच्या हमीभावावर पुनर्विचार करण्याची विनंती केली. पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होते. २०११ -१२ मध्ये कृषीमूल्य आयोगाने कापसाचा हमीभाव २ हजार ८०० रुपये प्रति क्विंटल दिला होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ८०० रुपये वाढवून ३ हजार ६०० रुपये करण्यात आला आहे. मात्र, ही वाढ पर्याप्त नाही. एकूण लागवड आणि खतांच्या वाढलेल्या किंमती पाहता शेतकऱ्यांना या भावात कापूस विकणे परवडत नाही.

विदर्भ आणि खान्देशात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होते. बीटी कॉटनचे अधिक प्रमाणात उत्पादन आहे. मात्र, सिंचनाच्या सोयीअभावी एक एकरमध्ये सरासरी दोन क्विंटल कापसाचे पीक मिळते. उलट लागवडीचा खर्च अधिख असतो. पंजाबमधील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची स्थिती याउलट आहे. तिथे एवढ्याच लागवडी मूल्यात एका एकरमागे सरासरी १० क्विंटल कापूस उत्पादन घेतले जाते. यामुळे हा हमीभाव त्या राज्याला परवडण्यासारखा आहे.

विदर्भ आणि खान्देशातील केवळ तीन टक्के कापसाचे उत्पादन हे सिंचन असलेल्या जमिनीत होत आहे, तर उर्वरित उत्पादन हे कोरडवाहू जमिनीतून घ्यावे लागते. याकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधण्यात आले. यावर लवकरच कृषिमंत्री शरद पवार यांच्याशी चर्चा करु, असे पंतप्रधानांनी सांगितले.

सत्तेच्या गुर्मी विरोधात जनतेचा उठाव हवा

राजू शेट्टी यांचे समडोळीतील मेळाव्यात प्रतिपादन

समडोळी : दंगली आणि रक्तपात घडविल्याशिवाय आपली पोळी भाजताच येत नाही असा समज करुन जनतेची दिशाभूल करणाऱ्यां बरोबर सत्तेची गुर्मी चढलेल्यांना वेळीच धडा शिकवा. त्यासाठी जनतेतून संघटित उठाव होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

समडोळी (ता. मिरज) येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पुढाकाराने ग्रामपंचायतीच्या सर्व जागा जिंकल्या आहेत. संघटनेच्या नेतृत्वाखाली

झालेले ऊस आंदोलन यशस्वी झाले आहे. त्यानिमित्त आयोजित विजयी मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्यापूर्वी खासदार शेट्टी, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, जिल्हाध्यक्ष सयाजीराव मोरे, बाबासाहेब सांद्रे आदिंसह मिरवणूक काढण्यात आली.

माजी मंत्री मदनभाऊ पाटील, शिवाजीराव नाईक, सर्वोदय कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज पवार, माजी जिल्हापरिषद अध्यक्ष आनंदराव डावरे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश पाटील, माजी सरपंच महावीर चव्हाण, बाबासाहेब पाटील आदिंसह ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.

ऊस आंदोलनातील पोलीस गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या चंद्रकांत नलावडे, पुंडलिक कोकाटे यांना आदरांजली वाहण्यात आली. स्वागत संजय बेले यांनी केले. महावीर चव्हाण म्हणाले, समडोळी ग्रामपंचायत निवडणुकीत गट – तट, पक्ष बाजूला ठेवून मिळविलेला ऐतिहासिक विजय भविष्यातील परिवर्तनाची नांदी ठरेल.

खास. शेट्टी म्हणाले, आपण काही केले तरी कोणी विचारणार नाही, या भ्रमात वावरणाऱ्यांना नैतिकतेचा विसर पडलेला आहे. खाकी वर्दीवाल्यांनाही जबाबदारीचे भान उरलेले नाही. त्यामुळे जनतेत उद्रेकाची लाट पसरते आहे. माजी मंत्री मदन पाटील म्हणाले, समडोळीत विकासकाम ांबाबत जनतेने केलेले परिवर्तन निश्चितपणे चांगले आहे. यापुढे सांगलीचा खेळ येथे चालू न देण्याची दक्षता प्रत्येकाने बाळगावी.

मेळावा घेण्याचा हक्क नाही

सदाभाऊ खोत म्हणाले, सरकार महिलांचे संरक्षण करु शकत नाही त्यांना युवतींचे मेळावे घेण्याचा हक्क नाही. शेट्टी म्हणाले, खासदार फंडातून प्रत्येक गावात काटा उभारण्याच्या योजनेचा प्रारंभ समडोळीतच होणार आहे. व्यासपीठावर राष्ट्रवादी कॉंग्रेस वगळता अन्य सर्व पक्षांचे नेते उपस्थित होते. निमित्त सत्कार समारंभ व विजयी मेळाव्याचे असले तरी टीकेचा रोख ग्रामविकास मंत्री जयंत पाटील व त्यांच्या समर्थकांकडेच होता.

सदाभाऊ खोत म्हणाले, समडोळीत जनशक्ती धनशक्तीचा पराभव करु शकते हे येथील जनतेने दाखवून दिले आहे. शिवाजीराव नाईक म्हणाले, खास. शेट्टी यांनी निवडून गेल्यानंतर जनतेची विशेषत: शेतकऱ्यांची विश्वासार्हता कायम ठेवली आहे.

पृथ्वीराज पवार म्हणाले, येथील लोकप्रतिनिधींनी जनतेचा अपेक्षा भंग केलेला आहे. हे जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे सर्वोदयचा निकाल लागल्यानंतरच त्यांना त्यांची जागा दाखवू. सुरेश पाटील, बाबासाहेब पाटील, उपसरपंच रविंद्र पाटील, दीपक मगदूम, विद्याधर बेले, महावीर बिरनाळे, शितल बेले यांनी मनोगत व्यक्त केले. सरपंच गुंडा कोळी व उपसरपंच रविंद्र पाटील, सर्व सदस्य तसेच बाबगोंडा पाटील (देवणे) यांचा सत्कार झाला. सूर्यकांत मगदूम यांनी आभार मानले.

काटमारी नव्हे वाटमारी

कोल्हापूर : शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे साखर कारखानदारांना 'बॅकफूट' वर जात ऊसाला भाव देणे भाग पडत आहे. पण याचा पुरेपुर 'बदला' काही कारखानदार काटामारीच्या माध्यमातून घेत आहेत. प्रत्येक खेपेमागे एक ते दीड टन काटा मारत काही मोजके साखरसम्राट शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर खुलेआम दरोडा घालत आहेत. यामुळे सरकारचाही कोट्यावधीचा कर बुडत आहे. वैधमापन खाते व उत्पादन शुल्कचे अधिकारी तपासणीचा केवळ फार्स करीत 'मालामाल' होत आहेत. शुगल लॉबीचा दबाव असल्याने सरकारही कधीच कडक कारवाई करु शकत नाही. त्यामुळे आता ही वाटमारी रोखण्यासाठी गावोगावी वजन काटे उभा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

'हार्डवेअर' मध्ये बदल

अलीकडे काही कारखान्यात संगणकीय वजन पध्दत आली आहे. यामध्ये वजन काट्यामध्ये फिलर गेज (लोड सेल) वापरले जाते. यावर ऊसाच्या वजनाचा दाब पडल्यानंतर त्यामध्ये इलेक्ट्रो मॅगनेटिक फोर्स तयार होतो. वजन काट्यावरील सिस्टिम तो दाब सेन्सर करुन त्याचे मेट्रिक टन व किलोमध्ये रुपांतर करते. या वेळी संगणकाच्या हार्डवेअर व साफ्टवेअरमध्ये फेरफार करुन रिमोट सेन्सर वापरुन काटामारी केली जाते. हार्डवेअरमध्ये बदल करुन स्क्रूने सेट करुन दाब वाढविला जातो. यामुळे वजन आपोआप घटते. शेतकरी, ट्रॅक्टर चालक अथवा वैधमापन खात्याचे अधिकारी जरी आले तरी ही काटामारी समजू शकत नाही. महत्वाचे म्हणजे ज्या काट्यावरुन भरलेले वाहन आत गेले त्याच काट्यावरुन रिकाम्या वाहनाचे वजन केले तर हा फरक समजू शकतो. पण सर्व कारखान्यावर भरलेल्या वाहनांचे वजन दोन वेगवेगळ्या काट्यावर केले जाते.

खासदार निधीतून काटे उभारणार : खा. शेट्टी

गेल्या अनेक वर्षापासून साखरसम्राट काटामारी करुन शेतकऱ्यांची मोठी लूट करीत आहेत. आंदोलनामुळे दर मिळत आहे. मात्र, आता काटामारीकडे लक्ष देण्याची गरज आहे. यासाठी गेली दोन वर्षे प्रयत्न सुरु आहे. संसदेत पाठपुरावा केल्यामुळे केंद्र सरकारने देशभर वजनकाटे उभा करण्याचा निर्णय दिला आहे. मी खासदार फंडातून मतदार संघात काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर वजन काटे लवकरच उभा करणार आहे. शेतकऱ्यांनी आमदार व खासदारांकडे याबाबत आग्रह धरावा.

पान १३ वर ▶

काटमारी नव्हे वाटमारी

▶ पान १२ वरुन

अतिरिक्त टनेज, साखरेचा हिशेब कोटींच्या घरात

या दोन्ही प्रकारात साधारणपणे एका टनामध्ये १०० किलो घट केली जाते. त्यामुळे १० टनामागे एक टन काटामारी सर्रासपणे होते. एका दिवसात एका कारखान्याचे ५००० टन गाळप धरले तर दररोज सुमारे ५०० टनांची काटामारी होते. जिल्ह्यातील १५ कारखान्यांना हा हिशेब साडेसात हजार टनांपर्यंत जातो. अडीच हजाराच्या पहिल्या हप्त्याच्या दराने हा दरोडा एक कोटी ८७ लाख ५० हजारांपर्यंत जातो. या काटामारीत नऊ लाख टन साखर अतिरिक्त उत्पादन होते. ३५ रुपयाने ही साखर विकली गेली तर तीन कोटी १५ लाखांचा शेतकऱ्यांच्या घामावर सरळसरळ दरोडा घातला जातो. महिन्याचा व पूर्ण हंगामाचा हिशेब काढायचा तर आकडेवारी कितीतरी कोटीत जाते. काटामारीतून सरकारचे कोट्यावधीचे कर चुकतात. ऊसाचे वजन घटल्यामुळे तितका खरेदी कर चुकतो. साखर 'मुरवल्यामुळे' उत्पादन शुल्क मोठ्या प्रमाणात बुडते.

साखरसम्राटांची वाटमारी बंद पाडू : खोत

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने दराबाबत साखरसम्राटांना माघार घ्यावी लागत आहे. पण याचा बदला ते काटामारीतून घेत आहेत. अनेक कारखाने खेपेमागे दीड ते दोन टनाचा काटा मारत आहेत. याचा शेतकऱ्यांना जबर फटका बसत आहे. वैधमापन खाते याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. कोट्यावधीचा खरेदी कर व उत्पादन शुल्क कर चुकविला जात आहे. अतिरिक्त होणारी साखर संचालक मंडळात वाटून खाल्ली जात आहे.

वजन काट्याच्या 'सॉफ्टवेअर' मध्ये फेरफार

काटामारीचा आणखी एक गुप्त मार्ग म्हणजे सॉफ्टवेअरमध्ये बदल करणे, इलेक्ट्रिकल रिमोट सेन्सरचा वापर करुन दाब कमी - जादा केला जातो. संगणकीय सॉफ्टवेअरच्या प्रोग्रॅमध्ये सेंटिंक करुन ही फसगत केली जाते. त्याचा कोड नंबर गुप्त असतो. तो वजन काट्यावरील कर्मचाऱ्यांनाही माहित नसतो. काही अत्यंत विश्वासू कर्मचाऱ्यांना व संगणकप्रणाली तयार करणाऱ्या कंपनी अथवा सल्लगार यांच्याव्यतिरिक्त हा प्रकार कोणाच्याही लक्षात येत नाही.अलीकडे स्पर्धा परीक्षेतून आलेले अधिकारी मात्र ही काटामारी अचूक ओळखतात. म्हणून ते कोड नंबर मागतात, पण असे अधिकारी विरळच असतात. वजनमापे अधिकारी आल्याची बातमी गेटवर आल्यानंतर काट्यावरची यंत्रणा लगेच सावध होते. त्यावेळी काटा खोलून दाबाचा स्क्रू ॲडजेस्ट करण्याची गरज नसते. टीव्हीचे चॅनेल बदलल्याप्रमाणे रिमोट सेन्सर हे काम अचूकपणे करतो.

हायड्रॉलिकची हातचलाखी !

काटामारीच्या सुरवात बायडिंग घट करण्यापासून होते. यात हातसफाई केल्यानंतर ऊसाचे वजन घटविण्याचा प्रकार केला जातो. त्यासाठी काट्यामध्ये हेराफेरी केली जाते. प्रत्येक कारखान्यावर वजन करण्यासां दोन काटे असतात. एकावर ऊसाचे भरलेल्या वाहनाचे तर दुसऱ्यावर रिकाम्या वाहनाचे वजन केले जाते. काही ठिकाणी हे वजन काटे हायड्रॉलिक प्रेशरवर चालतात व मॅन्युअली ऑपरेट केले जातात. यामध्ये वाहनाचे वजन केल्यानंतर हाताने पावतीमध्ये नोंद करताना हातचलाखी केली जाते. भरलेल्या वाहनांचे वजन कमी करणे व रिकाम्या वाहनाचे वजन वाढविणे अशीही चलाखी केली जाते. तसेच काटे कर्मचाऱ्यांव्दारे ऑपरेट करण्याच्यावेळी पायाने दाबल्या जाणाऱ्या हायड्रॉलिक खाली लाकडी पट्टी ठेवली जाते. त्यामुळे काटा थांबून ठराविक टनापर्यंत ताणला जातो. जादा वजन दाखवायचे असेल तर ती पट्टी काढली जाते. दिवसभर कमी झालेले वजन रात्री भरुन काढले जात होते. त्यामुळेच काही कारखान्यांच्या संचालकांच्या ऊसाचे एकरी १०० टन उत्पादन निघत आहे.

मांगलेत पहिला ऊस वजनकाटा : खा. शेट्टी

मांगले : शिराळा तालुक्यातील मांगले येथे माझ्या खासदार फंडातून पहिला ऊस वजनकाटा उभारणार असल्याची घोषणा खासदार राजू शेट्टी यांनी केली.

मांगले (ता. शिराळा) येथील विविध विकासकामांचे उद्घाटन, माजी सभापती राजारामबापू पाटील चौक नामकरण व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक अध्यक्षस्थानी होते.

खा.शेट्टी म्हणाले, शेतात रात्रंदिवस राबून ऊस पिकविणाऱ्यांचा ऊस वजनकाटा मारणाऱ्यांचा काटा काढण्यासाठी मी संसदेत पाठपुरावा करुन खासदार फंडातून वजनकाटा उभा करण्याची परवानगी संपूर्ण देशासाठी मिळवून घेतली. माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक म्हणाले, २५ टक्केपेक्षा कमी निधी खर्च झाल्याचे दाखवून वाकुर्डे योजना बंद पाडण्याचा प्रयत्न केल्यास त्याविरुध्द आवाज उठवू. मूळ वाकुर्डे योजना मार्गी लावली. मात्र त्याचे नारळ दुसऱ्यांनी फोडले. ग्रामपंचायत निवडणुकीत खोट्या बाता मारणाऱ्यांना धडा शिकविला. आम्ही एकट्याच्या ताकदीवर लढत दिली. त्याला जनतेने साथ दिली. कामासाठी आमच्याकडे लोकांची रीघ लागते. मात्र विरोधकांची भेट होत नाही.

शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत म्हणाले, कारखानदारीतून जनतेला गुलाम बनविण्याचे धोरण शासन राबवत असून साखर कारखानदारांच्या मलईतून गब्बर झालेले चोर आहेत. बारामतीचे काका – पुतणे शेतकऱ्यांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. जातीचे मुद्दे काढले तरी शेतकरी जागृत आहेत. तुम्हाला येत्या निवडणुकीत बांगड्या भरल्याशिवाय राहणार नाही.

यशवंत ग्लुकोजचे अध्यक्ष रणधीर नाईक , प्रल्हाद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सरपंच मोहन पाटील, संदीप तडाखे आदी सदस्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यशवंत ग्लुकोजचे अध्यक्ष रणधीर नाईक, प्रल्हाद पाटील, सुखदेव पाटील, राजन पाटील उपस्थित होते. प्रा. भीमराव गराडे – पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. शिवाजी पवार यांनी सूत्रसंचालन केले. राजन पाटील यांनी आभार मानले.

खासगी काट्यावरही ऊसाचे वजन करा : श्रीमंत पाटील

सांगली : खासदार फंडातून ऊस वजनकाटे उभे करायची खासदार राजू शेट्टी यांची भूमिका स्तुत्य आहे. तसे काटे उभे राहिल्यास ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे, मात्र ते काटे उभे राहीपर्यंत खासगी वजन काट्यावर शेतकऱ्यांनी तुलनेसाठी त्यांच्या उसाचे वजन करावे. या उपक्रमासाठी खासदार शेट्टी आणि त्यांच्या शेतकरी संघटनेने पुढाकार घ्यावा, असे आवाहन अथणी शुगर्सचे अध्यक्ष श्रीमंत पाटील यांनी केले.

श्री. पाटील म्हणाले, खासदार शेट्टी यांनी ऊस वजनाचा आणि वजन काट्यांचा विषय हातात घेतला ते चांगले झाले. तो विषय शेतकरी संघटनेने हाती घेणे आवश्यकच होते. तसेच खासदार फंडातून वजन काटे उभे करायचा निर्णयही चांगला आहे.

मात्र तसे काटे उभे राहिपर्यंत काही काळ जाणार आहे. तोपर्यंत शेतकऱ्यांना त्यांच्या उसाचे वजन तपासण्यासाठी खासगी वजन काट्यांचा वापर करता येणे शक्य आहे. त्यामुळे कारखान्याकडे पाठवलेला आपला ऊस किती वजनाचा आहे, त्याचा शेतकऱ्यांना अंदाज येऊ शकेल. त्यासाठी खासदार शेट्टी यांनी पुढाकार घ्यावा.

आले नफा मिळवून देणारे बहुगुणी पीक

आले हे बहुगुणी मसाल्याचे व भरघोस नफा मिळवून देणारे पीक म्हणून ओळखले जाते. हे पीक कोल्हापूर जिल्ह्यासारख्या खात्रीशीर पाऊस पडणाऱ्या भागात आल्याची लागवड फायदेशीर होऊ शकते. म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या भागात आल्याची लावगड करून भरपूर पैसा मिळवणे शक्य आहे.

आल्याची लागवड दमट व उबदार हवामान असल्यास उत्तम ठरते. एप्रिल ते मे महिन्यात ३० ते ३५ अंश सेल्सिअस तापमान असल्यास उगवणीसाठी अनुकूल असते. कोरडी थंड हवा थेट पोसण्यास मदत होते. आल्यासाठी हलकी ते मध्यम चांगली निचरा होणारी भूसभुशीत जमिन योग्य असते. आल्याच्या पिकानंतर त्याच जमिनीत आल्याचे पीक घेऊ नये. जमिन तयार करताना १० ते १५ टन शेणखत अथवा कंपोस्ट खत, तसेच ७ ते १० कि. ट्रायको डरमा व्हिरडी जीवाणू खत मिसळून शेतभर पसरावे. महाराष्ट्रात मोक्या, अंगाऱ्या, जमेता जपानी अशा आल्याच्या जाती आहेत. त्यातील एखादी जात निवडावी.

लागवडीसाठी आल्याची २०५ ते ३ सेंमि. लांबीचे व २५ ते ३० ग्रॅम वजनाचे रोगविरहीत बेणे, १ ते २ डोळे असलेली खात्रीशीर ठिकाणातून घ्यावेत. कंद कुजव्या व कंदमाशी पिकास लागू नये. म्हणून लागवडीपूर्वी बियाण्यास ५० टक्के बिएचसी, डायथेन एम ४५, थायरस याची द्रवणात भिजवून नंतर बियाणे लावडीसाठी वापरावेत.

लागवडीसाठी चांगल्या प्रतिचे बियाणे हे १५०० किलो वापरावा. लागवण शक्यतो एप्रिल मे महिन्यात करावे. लागवणीसाठी सपाट पध्दत वापरून २ बाय १ मिटर किंवा दीड बाय३ मीटर सपाट वाफ्यात २५ बाय २२.५ मिटर किंवा २० बाय २० सेमी अंतरावर शक्यतो ५ सेमी जादा खोल कंद जाणार नाही असे करावा. काही भागात सरी – वंरबा पध्दतीत लागवड करून चांगले उत्पन्न मिळवले आहे.

पिकाच्या जोमदार वाढीसाठी प्रति हेक्टरी ७५ किलो नत्र, ३५ किलो स्फूरद व ३५ किलो पालाश असे रासायनिक खताचा डोस द्यावा. स्फूरद व पालाश लागणीवेळी व नत्र दोन टप्प्यात द्यावे. उन्हाळ्यात पाणी १० ते १२ दिवसाच्या अंतराने पावसाळ्यात शक्यतो पाणी देण्याची गरज भासत नाही. व हिवाळ्यात १८ ते २० दिवसाच्या अंतराने द्यावे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात खोल खुरपण करावी व माती भूसभुशीत करून कंदाभोवती लावावेत. त्यामुळे कंद पोसण्यास मदत होते. लागण केल्यापासून ६ते ७ महिन्यात फुलाचे कोंब बाहेर येऊ लागतात. त्यावेळी गड्डे पोसू लागतात असे समजावे.

पान १६ वर ▶

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने नागपूर येथील विधानभवनावर कांदा, ऊस, द्राक्षे, भात आदी पिकांना योग्य हमीभाव द्यावा या मागणीसाठी कैफियत मोर्चा काढण्यात आला. यावेळी खासदार राजू शेट्टी यांना विदर्भातील शेतकऱ्यांच्यावतीने रूम्हने भेट देण्यात आले. यावेळी उपस्थित स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर व इतर.

आले नफा मिळवून देणारे बहुगुणी पीक

▶ पान १५ वरुन

आल्याचे पान पिवळे पडल्यास पीक काढणीसाठी योग्य समजून कुदळीने काढावे. सुंठ तयार करण्यासाठी २४५ ते २६० दिवसांनी निभार झाल्यानंतर काढावीत. कंद निवडलेले स्वच्छ धुवून घ्यावेत. त्यानंतर कंदावरील पापुंद्री काढावी व कंद तारेच्या चौकोनी पिंजऱ्यात ठेवावेत. नंतर ३ वेगवेगळ्या भांड्यात २०, २५ व ५० टक्के सोडिएम हायड्राक्साईड म्हणजे कॉस्टीक सोड्याचे द्रावण तयार करावे. व ती उकळावीत. आल्याचे कंद असलेला तारेचा पिंजरा प्रथम सोडाखार मिश्रणाच्या २० टक्के द्रावणात ५ मि. बुडवून ठेवावा. ५० सोडाखार द्रावणामध्ये कंदाचा पिंजरा अर्धा मिनटे बुडवून नंतर ४ टक्के ॲसिड द्रावणात दोन तास बुडवून ठेवावेत. हे कंद बाहेर काढून स्वच्छ धुवावेत व नंतर वाळवावेत. यालाच सुंठ म्हणतात. चांगले नियोजन करून आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळेल. म्हणून आल्याचे लागवड ही शेतकऱ्यांची काळाची गरज आहे.

०१

सप्तपदी - रात्रोशोत्सवात पेट

वाकलेल्या प्रगतच फळांवीस सदैव सलाम आहे ठाऊ भरताना आईनं केलेली मशागत डाळाच बुद्ध आहे.

स्वाभिमानी दिनमान

जानेवारी २०१३

मार्गशीर्ष - पौष शके १९३४

रवि	सोम	मंगळ	बुध	गुरू	शुक्र	शनि
दि. २५ ईद-ए-मिलाद	दि. २६ प्रजासत्ताक दिन	मार्गशीर्ष कृ. ४ आयकर संकल्प सप्ताहारंभ, कुर्मी महिलांना राखण उत्सव पंढरपूर म. १.३४ — १	मार्गशीर्ष कृ. ५ सर्वसंमत शिवूरात रामभाऊ सिंदे, कुणाळेश्वर — सदाशिव डाळ, डा. बिटा — २	मार्गशीर्ष कृ. ६ सदाशिवराव उत्सव, कुडाळ, अकलूजचे रौप्य गणपत, म. सातारा — ३	मार्गशीर्ष कृ. ७ सदाशिवराव उत्सव, कुडाळ, अकलूजचे रौप्य गणपत, म. सातारा — ४	मार्गशीर्ष कृ. ८ रामदासमिशनचे १ वासवदत्तेचे दान कुरवडे वि. सातारा — विठ्ठल डाळ, लासलगाव — ५
मार्गशीर्ष कृ. १ सेतुशोधी महा. उत्सव कुरुंदवाड, दिनमानची आवडे मांडवगड — ६	मार्गशीर्ष कृ. १० सी.एन.जी.कार महाराष्ट्र कुर्मीचा वेतनमान व. वाशिंगटन मोंगळूरु — ७	मार्गशीर्ष कृ. ११ सुभाष रामराणी सी एन.जी.कार भाडे उ. लोकांना दक्षिणा मोठा, उ. आवाजाचे खुलना मान.डोंगरूड — ८	मार्गशीर्ष कृ. १२ सदाशिव सी. मराठी मराठमाणे आदरी, पाचव रामभाऊची पान. उत्र.-जोगेरी — ९	मार्गशीर्ष कृ. १३/१४ शिवाजी अण्णाचा शुक्र ३.०१ ३.०१ पुढे ३.४१ पुढे, दा. मा. कुलगाव व. बाजा — १०	मार्गशीर्ष कृ. २० ● दर्श सेवा अण्णाचा दर्शनी दर्शनी १.१५ अण्णाचा पुढे ३.१५ दर्शनी पुढे — ११	पौष शु. १ रामभाऊ शिवाजी अण्णाचा अमरी शिवाजी अण्णाचा, शनिवार — १२
पौष शु. २ योगी श्री विठ्ठलसुंदरचे नव देवता (मिरज) कोल्हापूर स्थानाची आदी, कारा. — १३	पौष शु. ३ सहर राहाती गर्जना राव. पाच, अनोदी — १४	पौष शु. ४ शिवाजी शिवाजी मार्गाची राव. मिंधूरा म. मोंगळूरु — १५	पौष शु. ५ श्री. शंकरराव दत्तात्रियेतिथि महाराष्ट्र गोदिए, गणेश उ.पि. — १६	पौष शु. ६ वासिष्ठ राव. म. सातेरा — १७	पौष शु. ७ वासिष्ठ राव अनेरे,त.करगुट्टा आदी महाराष्ट्रीची पुढे दोडी — १८	पौष शु. ८ कुर्मीकडे मराठी मराठीमाणसे — १९
पौष शु. ९ वैकुंठाचाचारी ९ दि. विवाह म. बाजाची — २०	पौष शु. १० सोलापूरीचे दान ठाव.-नागराज — २१	पौष शु. ११ ★ कुर्मा रामभाऊ शुक्रवार, आदरणीय आदरी, सोटे — २२	पौष शु. १२ मराठी कुर्मांचा शेत आदी आदर राव. पाच. मोठे-मोठे — २३	पौष शु. १३ शासकीय विजय दिन शिवाजाद उत्सव — २४	पौष शु. १३ ★ हिं.-ए-मीलाद सप्ताहारंभ राव, सप्ताहारंभ — २५	पौष शु. १४ ★ ★ शनिवार दिन पौर्णिमा राव. म. ८.४४ — २६
पौष पौर्णिमा ○ शाकंभरी पौर्णिमा खाणीची म.१०.५८, पेठ शाक. पौर्णमा — २७	पौष कृ. १ शाहि उत्सव राजाज-मांडवाडी हाव हाव्यदार आदी — २८	पौष कृ. २ — २९	पौष कृ. ३ ★ महान संतेंद्र १ ते संकष्ट चतुर्थी मुंबई ९.१५ — ३०	पौष कृ. ४ मुक्तबाई गाव. मिलांचवाडा मोंगळूरु — ३१	दि. १४ मकर संक्रांती	शुभ दिवस दि. ९, १५, १३, १४, १५, १६, २०, २२, २३, २७

श्री भरत अर्बन को-ऑप. बँक लि. जयसिंगपूर

ह. वेळा: आणि(०१)४ सोम ४ (२०३), २०५४२,२०१२३ वेळा-०३३३-२२४३३

गावा कार्यालये - ०२३२२
शिरोळ २३६४५०
नांदणी २३५३२६
जयसिंगपूर २२५४३०
दत्तवाड २७०१२२
टोळी २३६६४९
उमळ, उगवाव सोंडेत व एड सेवाळ, रुपाळ व कर्मांची जी

शिरी आवडिजाज ग्रुपलिमिटेड

सोलर स्ट्रीट लाईट सोलर मोटर ५ डी सिलन स्टुडिओ आकुर्ड उपकरण

Green Energy Research Center

Chairman - Shardinath Patil
M. 9822597633
Bypass Road, Opp. Deep Public School, Jayasingpur.
Tel.Fax : 02322-225833
www.predyclassuimited.com
expressjsp22@yahoo.co.in

नेमिनाथ ट्रेडींग कंपनी

शेंगपेंड, सरकी पेंड व सर्व पशुखाद्य होलसेल विक्रेते

सुरेश आ. पाटील ९५९५९२३१६
उदय पाटील ८८०६८०८१८१
अभिनंदन पाटील ९९७५३८५५५२

८९ क्र. महावीरनगर, सांगली. फोन : (ऑ.) ०२३३-२६२४९०१

तमाम क्षेत्रकरी बांधवांना नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

अमल महादेवराव महाडिक

जिल्हा परिषद सदस्य
कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर

०३

इंदापूर अटक येरवडा जेल

मिरी इंदापना बहुत लगला मेरा मकसद नहीं मेरी कोशिश है ये सूरत बदलनी चाहिए। मेरे सीनेमें नहीं, तेरे सीनेमें सही हो कही भी आग, लेकिन आग जलनी चाहिए।

स्वाभिमानी दिनमान

मार्च २०१३

माघ - फाल्गुन शके १९३४

रवि	सोम	मंगळ	बुध	गुरू	शुक्र	शनि
फाल्गुन कृ. ५ रंगपंचमी इयर संडे — ३१	शुभ दिवस दि. १, २, १३, १४, १८, २०, २१, २४, २८, २९.	दि. २७ धूलिवंदन	दि. ३१ रंगपंचमी		माघ कृ. ४ संकष्ट चतुर्थी संकष्टा संकटी १.१५ चंद्रदर्शन दाता दाताच, म. सातारा — १	माघ कृ. ५ अंबुजा पंचमी बौद्धपाषाणकाली आदी, मोंगळूरु शास्त्रीय डाव. कोल्हा, इचलंजी — २
माघ कृ. ६ जोतिष क्षेत्रे सुरू रामुद्रा जगोंगाव पाटली-वेळा पैलवान डाव मोंगळू — ३	माघ कृ. ७ महान भू. डाव दिन लेखे अंबमाई व्रत, हुपरी कुलदाव अनंत, कागली — ४	माघ कृ. ८ रामदी राव, कर्मकी डाव (अमरी) आदीमिन — ५	माघ कृ. ९ श्री रामदास नवमी रामदास दास मराठे मानली राजुली कुपरीचे — ६	माघ कृ. १० दिवाळ मार्च रामभाऊ सुरवाई डाव कोंगळी — ७	माघ कृ. ११/१२ ★ भारवा रामभाऊ जगजिक नहिन दिन शिवाजाद डाव टोळे — ८	माघ कृ. १३ श्री शंकर संत महाभेकाव जयंती — ९
माघ कृ. १४ महाशिवरात्री अण्णाचा इयर ३.०१ २.३० म. वारीचेचे पुढे ३ दि. — १०	माघ अण्णाचा ● दर्श सेवा अण्णाचा — ११	फाल्गुन कृ. १ सत्यवाच महान जगजिति महाराणी डाव, हुपरी-मिरज — १२	फाल्गुन कृ. २ रामभाव चमत्कार जयंती राहाती वाचोळवा डाव, मेरे — १३	फाल्गुन कृ. ३ सकाई ज्ञानव महोत्सव दाव, मिरे — १४	फाल्गुन कृ. ४ विठ्ठल कुर्मी, पोळ उत्सव भाव म. गुलाब — १५	फाल्गुन कृ. ५ जयप्रकाश म.२.३१, विंगव मिंधोरा भाव, मंगळ म. ०५.१ — १६
फाल्गुन कृ. ६ मुलाकारीचे उत्सव अमृत मेरुदे दत्त महान अमोघित, अंबा — १७	फाल्गुन कृ. ७ महाशिवरात्री कर्मराव डाव रमाद — १८	फाल्गुन कृ. ८ — १९	फाल्गुन कृ. ९ कुर्मीकडे विवाहभाषणाची पुढे दि. कामाकाची पुढे — २०	फाल्गुन कृ. १० मराठीचे मराठिक भाषणी दान लाभव, कुर्मी म.पिकोडी — २१	फाल्गुन कृ. ११ ★ आण्णाची रामराणी भाषणीय, रामभाव, गुलाबेर मुगोडेव — २२	फाल्गुन कृ. १२ — २३
फाल्गुन कृ. १२ जालगाडुवाव महाराज दु.दि. बाबी प्रदोष — २४	फाल्गुन कृ. १३ विलाजाव आदी, देवी आंबोलची शिवरात्रव रोळकोट, शिंदूर — २५	फाल्गुन कृ. १४ हुताशनी पौर्णिमा होळी होळी संवे. म.२४ — २६	फाल्गुन पौर्णिमा ○ धुलिवंदन — २७	फाल्गुन कृ. १ वासंतोत्सवारंभ मधुर मधर डाव कोंगळे — २८	फाल्गुन कृ. २ शेत दुसरवर शेत दुसरवर — २९	फाल्गुन कृ. ३/४ संकष्ट चतुर्थी संकष्टा म. ६.५० — ३०

श्री भरत अर्बन को-ऑप. बँक लि. जयसिंगपूर

ह. वेळा: आणि(०१)४ सोम ४ (२०३), २०५४२,२०१२३ वेळा-०३३३-२२४३३

गावा कार्यालये - ०२३२२
शिरोळ २३६४५०
नांदणी २३५३२६
जयसिंगपूर २२५४३०
दत्तवाड २७०१२२
टोळी २३६६४९
उमळ, उगवाव सोंडेत व एड सेवाळ, रुपाळ व कर्मांची जी

शिरी आवडिजाज ग्रुपलिमिटेड

सोलर स्ट्रीट लाईट सोलर मोटर ५ डी सिलन स्टुडिओ आकुर्ड उपकरण

Green Energy Research Center

Chairman - Shardinath Patil
M. 9822597633
Bypass Road, Opp. Deep Public School, Jayasingpur.
Tel.Fax : 02322-225833
www.predyclassuimited.com
expressjsp22@yahoo.co.in